# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-**

**दिनांक: 12/06/2017.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **जून महिन्याची सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक 20 जून 2017 रोजी सकाळी 11.00 वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** प्रश्नोत्तरे.

**2.** परिवहन समिती सदस्य पदाच्या रिक्त होणाऱ्या सहा जागांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे.

**आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती व विधी समितीचा ठराव :**

**3.** नमुंमपाच्या सार्वजनिक रूग्णालय वाशी येथील रूग्णालयात CT Scan सुविधा सुरू करणे.

**4.** नमुंमपाच्या सार्वजनिक रूग्णालय ऐरोली व नेरूळ येथील रूग्णालयात डायलेसीस सुविधा बाह्य यंत्रणेद्वारे सुरू करणे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

**5.** खाजगी वैद्यकिय महाविद्यालये / खाजगी वैद्यकिय संस्था यांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील रुग्णखाटा शैक्षणिक प्रयोजनासाठी देण्यासाठी शुल्क आकारणे.

**6.** नेरूळ से-20 येथील सी ब्लॉक येथे गटर, रस्ता व पदपथाची दुरूस्ती करण्याच्या करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**7. श्रीम. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-**
**"महिला व बालकल्याण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**8. श्रीम. सलुजा संदिप सुतार, यांजकडून :-**
**"आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**9. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**
**"पाणीपुरवठा व मलनि:स्सारण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**10. श्री. लिलाधर गणपत नाईक, यांजकडून :-**
**"क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**11. श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**
**"समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**12. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**
**"विधि समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**13. श्रीम. सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-**
**"विद्यार्थी व युवक कल्याण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**14. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**
**"उद्यान व शहर सुशोभिकरण समिती"** हि विशेष समिती पुढील 1 वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करणे.

**15 व 16. श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**

**(15)** प्रभाग क्र. 99 अंर्तगत से. 25 येथे प्लॉट क्र. 20 सिडकोकडून हस्तांतरित करुन घेवून त्याच्यावर लवकरात लवकर कम्युनीटी सेंटर बांधणे. तसेच से. 27 येथे गार्डनची सुविधा नाही. तरी तेथे प्लॉट क्र. 23A येथे उद्यान विकसित करणे. **(16)** प्रभाग क्र. 99 अंर्तगत नेरुळ से. 25 से. 27, से. 23, से. 21, दारावे गांव येथे कुठेच भाजी-मच्छी मार्केटची सुविधा नाही. तरी जो पर्यंत मार्केट बांधून होत नाही तो पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात येथे मध्यवर्ती ठिकाणी ओपन मार्केट विकसित करणे.

**17 ते 19. श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**

**(17)** प्रभाग क्र. 74 मधील तुर्भे एम.आय.डी.सी. येथून सानपाडा से. 10 जुईनगर रेल्वे स्टेशन मार्गे जो पावसाळी नाला आहे तो दरवर्षी पावसाळयात तुडूंब भरुन वाहत असतो. मागील कित्येक वर्ष सदर नाल्यातील गाळ ही काढला नसल्यामुळे सदर नाल्याची खोली कमी झाली आहे. त्यामुळे हया वर्षी डोंगर दऱ्यामार्गे सदर नाल्यात येणारे पावसाचे पाणी सानपाडा पिंपळपाडा व सानपाडा से. 10 मध्ये घुसण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी असलेल्या नाल्यातील संपुर्ण गाळ काढून हया नाल्यास संरक्षक भिंत बांधावी. तसेच नाल्याच्या संरक्षक भिंतीलगत असलेल्या जागेवर मोठया प्रमाणात डेब्रीज टाकत असल्यामुळे घाणीचे साम्राज्य तयार झाले आहे. तरी सदर मोकळया जागेस तारेचे कुंपन घालून सदर ठिकाणी मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करणे. **(18)** प्रभाग क्र. 74 अंतर्गत सानपाडा से. 10 मध्ये असलेल्या ट्री बेल्ट मध्ये सध्यस्थित मोठया प्रमाणात डेब्रीज पडलेले असुन त्यामुळे सदर परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तरी सदर ट्री बेल्ट चे सुशोभिकरण करुन सदर ठिकाणी लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी बसवावी व त्यांच्या आरोग्य स्थिरतेसाठी ओपन जिम ही तयार करणे. **(19)** प्रभाग क्र. 74 अंतर्गत सानपाडा से. 10 मधील ज्ञानदिप, साईकृपा, लक्ष्मी, शिवकृपा, गणेशकृपा, सरस्वती, सप्तर्षी सोसायटी अंतर्गत मलनि:स्सारण वाहिन्या अत्यंत खराब अवस्थेत असल्यामुळे त्यातील मल हे वसाहतीतील आवारात वाहत असते. सदर ठिकाणी एका सोसायटीत मलनि:स्सारण वाहिनी बदलून त्या ठिकाणी नविन मोठया व्यासाची मलनि:स्सारण वाहिनी टाकण्यात आली असून उर्वरीत सातही सोसायटीतील मलनि:स्सारण वाहिन्या बदलणे.

**20 व 21. श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-**

**(20)** प्रभाग क्र. 110, करावे सेक्टर 32 मधील धारण तलाव (होल्डींग पाँड) ची सुधारण व सुशोभिकरण करणे.

**(21)** नवी मुंबई मध्ये होणारे आंतरराष्ट्रीय विमानतळ त्यामुळे होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी पामबीच रस्त्याला समांतर ऐरोली ते बेलापूर खाडीपुल येथे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्यामार्फत मुंबईच्या धर्तीवर कोस्टल रोड बांधणे.

**22 ते 24. श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**

**(22)** प्रभाग क्र. 47, सेक्टर 08 मधील ओमसाई ओनर्स असोसिएशन, सिध्दीविनायक ओनर्स असोसिएशन, सेक्टर 07 मधील सहयाद्री ओनर्स असोसिएशन, शिवप्रेरणा ओनर्स असोसिएशन, व ज्ञानेश्वर माऊली ओनर्स असोसिएशन मध्ये नवीन जलवाहिनी बसविणे. **(23)** प्रभाग क्र. 47, सेक्टर 08 मधील ओमसाई ओनर्स असोसिएशन व सिध्दीविनायक ओनर्स असोसिएशन मध्ये नवीन मलनि:स्सारण वाहिनी बसविणे. **(24)** प्रभाग क्र. 47, मध्ये स्ट्रीटलाईट बसविणे.

**25 ते 27. श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**

**(25)** माजी आयुक्त यांच्या मे 2016 ते मार्च 2017 या कालखंडामध्ये त्यांनी जे निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये काही निर्णय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाला न पाळता घेतलेले आहेत. सबब, त्यांनी घेतलेल्या सर्व निर्णयांची व नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावरील खातेनिहाय चौकशी (महाराष्ट्र महानगर-पालिका अधिनियम 2011 मध्ये कलम 56 मधील तरतुदी अन्वये) मा. स्थायी समिती यांच्याकडे करावयाचे अपील तसेच कलम 53(1) अंतर्गत मंजूर करावयाची स्वेच्छा निवृत्ती इतर विषयांवरील कायदेशीर तरतूदींचा अभ्यास करुन समर्पक निर्णय घेण्याकरीता चौकशी समिती नेमणे. **(26)** सेक्टर 19 भिमाशंकर सोसायटी ते उरण फाट्याजवळील हायटेंशन खाली लॉन लावून सुधारणा करणे. **(27)** सेक्टर 19अे, नेरूळ नवदुर्ग सोसायटी ते वंडर्स पार्क नाल्यालगतच्या रस्त्याची नव्याने सुधारणा करणे.

**28. श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**

प्रभाग क्र. 59, सेक्टर 11 वाशी नवी मुंबई येथील वेलकम बुक स्टोअर्स ते कै. राधा सुदाम भोईर निवास बिल्डींग येथील कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या बदलून तेथे मोठया व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे व तेथे इंटरलॉक बसविणे.

**29. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**

प्रभाग क्र. 29 घणसोली 2 या प्रभागात सिडको वसाहतीचा भाग येत आहे. सेक्टर 21 व 22 हे सेक्टर या प्रभागात येतात. या सेक्टर मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण केले नाही. त्यामुळे येथील रहिवाश्यांना खराब रस्त्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. पावसाळयात परिस्थिती अजुन बिकट होते. सदरचा भाग हा सिडको प्राधिकरणाकडून नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत झाला आहे. तरी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

**30 व 31. श्रीम.सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-**

**(30)** प्रभाग क्र. 31, मधील आदीशक्ती नगर येथील बाळू पाटील यांचे घराजवळील गटर व समर्थनगर येथील कैलास पोखरकर यांचे घराजवळील गटरांची उंची वाढविणे व पदपथ दुरुस्ती करणे. **(31)** प्रभाग क्र. 31, मधील समर्थनगरातील प्रगती निवास जवळील रस्त्यावर हेव्ही डयुटी ब्लॉक लावणे.

**32 ते 34. श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

**(32)** प्रभाग क्र. 101, मधील आग्रोळी उड्डाणपुलाखाली समाज हॉलमध्ये पिण्याच्या पाण्याची लाईन जोडण्यात यावी व शौचालयाची व्यवस्था करणे. **(33)** प्रभाग क्र. 101, मधील एकता विहार व निलगिरी गार्डन सोसायटी समोरील गेटजवळ नवीन आसन व्यवस्था व निवारा शेडची व्यवस्था करणे. **(34)** प्रभाग क्र. 101, मधील पारसिक हिल येथे कंटेनर पोलिस चौकीची व्यवस्था करणे.

**35 व 36. श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**

**(35)** प्रभाग क्र. 23, ऐरोली, से. 09 व 10 येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. **(36)** प्रभाग क्र. 23, ऐरोली, से. 09 व 10 येथील पदपथांवर रेलिंग बसविणे.

**37 व 38. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**

**(37)** प्रभाग क्र. 83, जुईनगर मधील मार्केटच्या सर्व राखीव प्लॉटचे हस्तांतरण सिडकोकडून करुन घेऊन नागरिकांसाठी सुसज्ज मार्केट लवकरात लवकर बनविणे व मराठी शाळा क्र. 17 च्या बाजूला असलेल्या मोकळया जागेत शाळेचे सभागृह बनविणे. **(38)** प्रभाग क्र. 83, जुईनगर येथे मलनि:स्सारण वाहिन्या मधील पाण्यावर प्रक्रिया करून तेच पाणी परिसरातील झाडे व सोसायट्यांना मागणीनुसार पुरवून पिण्याच्या पाण्याची सार्वत्रिक बचत करणे.

**39 ते 41. श्री. विजय लक्ष्मण चौगुले, यांजकडून :-**

**(39)** प्रभाग क्र. 07, चिंचपाडा येथे ज्योर्तिलींग चाळ, जयभवानी चाळ व दत्तमंदिर परिसरात मलनि:स्सारण वाहीन्या टाकणे. **(40)** प्रभाग क्र.07, चिंचपाडा येथे स्ट्रीट लाईट बसविणे. **(41)** प्रभाग क्र. 07, चिंचपाडा येथील अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे.

**42 ते 44. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**

**(42)** प्रभाग क्र. 12, सेक्टर-2 या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या यु.एच.पी (U.H.P) वास्तूचे बांधकाम करण्यात येत आहे. तरी वास्तू हूशार, गरजू तसेच होतकरु विद्यार्थ्यासाठी मिशन IAS/IPS अॅकाडमिसाठी सुभद्राआई बहूउददेशिय संस्थेच्या नावाने देणे. **(43)** प्रभाग क्र.12, सेक्टर-2 मधील एल,आय, जी गृप मधील घरांवरुन विदयुत प्रवाहाच्या मोठया वाहीन्या आहेत. प्रभागातील ओव्हरहेड वायरचे 60 ते 65% काम पुर्ण झालेले असून उर्वरित राहिलेल्या ठिकाणांवरील भाग अतिसंवेदनशिल असून त्या ठिकाणाहून दररोज 5000 ते 6000 विदयार्थी शाळेतून ये-जा करीत असतात भविष्यात त्याठिकाणी अपघात होण्याची दाट शक्याता असून उर्वरित राहिलेले बी-गृप, सी-गृप, ई-गृप, डी-गृप, मधील ओव्हरहेड वायरचे काम चालू करुन भुमिगत करणे. **(44)** प्रभाग क्र. 12, सेक्टर-2 या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत जे मोकळे भुखंड आहेत.त्या भुखंडावर नवी मुंबई महानगर-पालिकेने सुशोभिकरण करुन द्यावे तसेच प्रभागाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या ठिकाणी प्रियांका हॉटेल जवळ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने भव्य-दिव्य कमान बांधून देणे.

**45 व 46. श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-**

**(45)** प्रभाग क्र. 92, दारावे येथील कै यशवंतराव चव्हाण मैदानामध्ये नेरूळ-दारावे परिसरातील खेळाडू खेळण्यासाठी येत असतात. सदर मैदानात खेळाडूंना विश्रांती घेण्यासाठी स्टेज, तसेच प्रेक्षकांना बसण्यासाठी स्टॅण्ड व संरक्षण भिंत, गेट बांधणे. **(46)** प्रभाग क्र. 92, दारावे येथील हिरा आर्केट हौसिंग सोसायटी, नवनिवारा को.हौ.सोसायटी ते गणेश कृपा सोसायटीपर्यंतच्या रस्ता नादुरूस्त झाल्याने सदर रस्त्याचे डांबरीकरण व पदपथ सुधारणा करणे.

**47 ते 49. श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**

**(47)** प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर-25 गणेश मैदानात ओपन जिम करणे. **(48)** प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर-24 येथील सिध्दीविनायक सोसायटी ते सुंदरम सोसायटीपर्यंत मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. **(49)**प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर-24 येथील स्मशानभूमीसमोरील असलेल्या भूखंडाला संरक्षणभिंत (कंपाऊंड वॉल) बांधणे.

**50 ते 52. श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**

**(50)** सिडकोने शहर नियोजन आराखड्यात घणसोली विभागातील सेक्टर 4 मध्ये खेळाचे मैदान यासाठी राखून ठेवलेला भूखंड क्रमांक 243 हा सिडकोकडून अधिग्रहीत करून त्या भूखंडाचा विकास करणे. **(51)** सिडकोने शहर नियोजन आराखड्यात घणसोली विभागात बाजार मंडई व फेरीवाला या कारणांसाठी राखून ठेवलेला भूखंड सिडकोकडून अधिग्रहीत करून त्या भूखंडाचा विकास करणे. **(52)** महासभेने बहूमताने मंजूर केलेल्या ठरावांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्या ठराव प्रस्ताव विषयांची वस्तुस्थितीदर्शकता पालिका सदस्यांना व समस्त जनतेला माहिती होण्यासाठी विषयवार तपशिलावर प्रसिध्दी छापील तसेच माहिती तंत्रज्ञान सेवेच्या माध्यमातून करणे.

**53 ते 55. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

**(53)** नवी मुंबई महानगरपालिकेकडून सध्या सन 2000 पर्यंत नवीन नळजोडणी देत आहे. परंतु जी घरे सन 2000 नंतर बांधलेल्या घरांना त्याचा लाभ मिळत नाही. जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही व त्यांना पाण्यापासून वंचित रहावे लागणार नाही याकरिता सन 2015 पर्यंतच्या घरांना (स्टँड पोस्ट) सार्वजनिक नळ कमीत-कमी लोकांमध्ये देणे. **(54)** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे सिध्दी विनायक मंदिराबाजूला असलेल्या कच्चा रस्त्याचे काँक्रीटीकरण करून तेथे हेवीड्युटी गटार बांधणे. **(55)** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील पदपथांची, गटारांची दुरावस्था झाली असून प्रभागातील दुरावस्थेत असलेल्या पदपथांची व गटारांची दुरूस्ती त्वरीत करणे.

**56 ते 58. श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**

**(56)** प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे सेक्टर 9 व 10 तसेच सेक्टर 12 मधील नाल्याला सिमेंट काँक्रेट (P.C.C.) करणे. **(57)** प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे साईनाथ साईकृपा हौ.सोसायटीच्या नाल्याच्या गार्डनला कंपाऊड वॉल बांधणे. **(58)** प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे संत वामनभाऊ भगवान बाबा उद्यानाला सुसज्ज गेट बसविणे.

**59 ते 61. श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**

**(59)** प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16A, 16 व 18 येथील नादुरूस्त व गंजलेल्या स्ट्रीटलाईट पोलच्या जागी नवीन आकर्षक स्ट्रीटलाईट पोल बसविणे. **(60)** प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर- 16 व 18 येथील सागरदर्शन टॉवर व सी ब्रीज टॉवर यांच्या पाठीमागे सर्विस रोडला असलेल्या जुन्या दगडी बांधकामाच्या पावसाळी गटाराची आर.सी.सी. पध्दतीने पुर्नबांधणी करणे. **(61)** प्रभाग क्र. 96, नेरूळ मध्ये ठिकठिकाणी विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांनाकरिता निवारा शेड उभारणे.

**62 व 63. श्रीम. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**

**(62)** प्रभाग क्र. 02, रामनगर मधील ईश्वरनगर मुकूंद कंपनी येथे 20 दशलक्ष लिटर ओव्हर हेड पाण्याची टाकी बांधणे. **(63)** प्रभाग क्र. 02, रामनगर मधील ईश्वरनगर आदर्श हायस्कूल शेजारी 12 सिटचे कंटेनर टॉयलेट बांधणे.

**64 व 65. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**

**(64)** नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त लोकांना लग्न कार्यासाठी अथवा इतर कोणत्याही कार्यक्रमासाठी नेरूळ येथील आगरी-कोळी भवनाच्या भाड्यामध्ये 50% सवलत दिली जाते. त्याप्रमाणे सिडकोने बांधलेल्या वाशी येथील एक्झीबीशन सेंटर मध्ये देखील प्रकल्पग्रस्तांना भाड्यामध्ये 50% सवलत द्यावी असे सिडकोस कळविणे. **(65)** प्रभाग क्र. 111, नेरूळ मधील सेक्टर 58अे तसेच एन.आर.आय. च्या पाठीमागे असलेली खाडी विकसित करून त्या ठिकाणी नवी मुंबईतील नागरीकांसाठी पर्यटन स्थळ तयार करणे.

**66 व 67. श्रीम. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-**

**(66)** नवी मुंबई महानगरपालिका नेहमी प्रत्येक नागरी सुविधा क्षेत्रात अव्वल आहे हे दाखवून दिलेले आहे. स्वच्छता क्षेत्रात नेहमी अग्रेसर राहीलेले आहे. अनेक स्वच्छतेचे पुरस्कार मिळवले आहे. संपूर्ण भारतात केंद्र शासनद्वारा 2017 स्वच्छता सर्वेक्षण झाले आहे. यामध्ये आपण आठवा क्रमांक मिळवला 2015 मध्ये आपला स्वच्छता क्रमांक देशात 3रा आला होता. पुढील सर्वेक्षणामध्ये परत प्रथम 3 क्रमांकामध्ये येण्याचा आपल्या सर्वाचा मानस आहे. त्याकरिता यामध्ये अधिक उपाययोजना व सुधारणा करून महानगरपालिकेचे नियंत्रण व निगराणी आवश्यक आहे. पुढील उपाययोजना व नियंत्राणासाठी एक नवी मुंबई स्वच्छता मिशन तदर्थ समिती गठित करण्याचा प्रस्ताव मी मांडत आहे.

सदर समिती कार्य-

- स्वच्छतेच्या सध्याच्या परिस्थितीची चौकशी व अभ्यास करणे.
- स्वच्छता आराखडा तयार करून महापालिकेस सादर करणे.
- उपाययोजना व धोरणात्मक अभिप्राय देणे.
- आराखडा अंमलबजावणी व स्वच्छताविषयक कामांवर देखरेक व नियंत्रण ठेवणे.
- स्वच्छताविषयक जनजागृतिक कार्यक्रम सूचवणे व आयोजित करणे.
- माहिती प्रकटित करणे.

वरील विशेष विषयासाठी पुढील कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31 अन्वये सात सदस्यीय नवी मुंबई स्वच्छता मिशन तदर्थ समिती गठित करणे.

| | |
|---|---|
| **(67)** जगामध्ये सध्या सर्वात गंभीर विषयक हा आपले पर्यावरण आहे. दिवसेंदिवस विविध कृत्यांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. ग्लोबल वॉरमिंग इफेक्ट होत आहे. याकडे दुर्लक्ष झाल्यास परिस्थिती हाता बाहेर होणार. कोणी दुसरा काय करतो यापेक्षा आपण काय करावे हे जरूरी आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळ हे कार्य करत आहे. आपण देखील पर्यावरणासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. मलप्रकिये व घनकचरास प्रक्रियामध्ये अभिमानाने सांगु शकते की संपूर्ण MMR Region मध्ये फक्त नवी मुंबई महानगरपालिकाच करते. यापुढे देखिल अनेक प्रकल्प अंमलात आणार आहोत. यासाठी एक धोरण व आराखड्याची आवश्यकता आहे. यासाठी एक समिती गठित करणे आवश्यक आहे.<br>नवी मुंबई महानगरपालिकेचे पर्यावरण संवर्धन धोरण व आराखडा तयार करण्यासाठी समिती गठित करण्याचा प्रस्ताव मांडते.<br>समितीने धोरण व आराखडा अंतर्गत -<br>• प्रदुषण नियंत्रण धोरण व आराखडा तयार करणे.<br>• धुळ नियंत्रण व प्रतिबंध धोरण तयार करणे.<br>• पर्यावरण संवर्धन आराखडा तयार करणे.<br>• अंमलबजावणी करून घेणे व निरीक्षण ठेवणे.<br>• सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करणे.<br>• जनजागृति करणे.<br>• माहिती प्रकटित करणे.<br>• महापालिकेस अहवाल व अभिप्राय देणे.<br>• पर्यावरण संवर्धन ही प्रथम प्राधान्य गरज आहे.<br>• सर्व मिळून यामध्ये हातभार लावून सहभाग घेतला पाहिजे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.<br>वरील विशेष विषयासाठी पुढील कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 31 अन्वये सात सदस्यीय पर्यावरण नवी मुंबई समिती गठित करणे. | **68 ते 70. श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>**(68)** प्रभाग क्र. 48 पावणे-खैरणे एम.आय.डी.सी. येथील प्रत्येक घरात ओला व सुका कचऱ्यासाठी प्रत्येक घरासाठी कचराकूंडी उपलब्ध करून देणे. **(69)** प्रभाग क्र. 48 पावणेगांव स्मशानभूमीमध्ये लाकडाची व्यवस्था त्याचप्रमाणे बहुउद्देशीय कर्मचारी नेमणूक करणे. **(70)** प्रभाग क्र. 48 पावणे-खैरणे एम.आय.डी.सी. भागातील रस्ते व सांडपाणी रासायनिक पाणी वाहून नेण्यासाठी बंदिस्त गटारे बांधणे.<br>**71 ते 73. श्रीम. संगीता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**<br>**(71)** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील पदपथांची दुरूस्ती लवकरात लवकर करणे. **(72)** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील मुख्य रस्त्यांवर (राजधानी स्वीटसमोर) से. 3, कोपरखैरणे तसेच (रोहित मसाला समोर) से. 6, कोपरखैरणे नवी मुंबई येथे हायमास्ट बसविणे. **(73)** प्रभाग क्र. 45, कोपरखैरणे मधील से. 6, 3 व से. 7 मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणे.<br>**74 ते 76. श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>**(74)** प्रभाग क्र. 30, मधील घणसोली सेक्टर 15 येथील भूखंड क्र. 25 शाळेसाठी राखीव आहे. या शाळेसाठी राखीव असलेल्या महापालिकेच्या भूखंडावर शाळेची इमारत बांधणे. **(75)** प्रभाग क्र. 30, मधील घणसोली सेक्टर 15 येथील भूखंड क्र. 27 हा भूखंड उदयानासाठी राखीव आहे. या महापालिकेच्या भूखंडामध्ये उद्यान विकसित करणे. **(76)** प्रभाग क्र. 30, मधील घणसोली सेक्टर 13 येथील भूखंड क्र. 01 हा क्रिडा संकुलासाठी राखीव आहे. या महापालिकेच्या राखीव भूखंडावर क्रिडा संकुल बांधणे. |

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 12 जून 2017.**